




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ९ फेब्रुवारी, १९४९ अंक ६



श्री श्री श्री श्री श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


# विविध माहिती

**रायटर्स वृत्तसंस्थेची भागीदारी**—ता. १ फेब्रुआरीपासून रॉयटर्स ह्या वृत्तसंस्थेंत हिंदी वृत्तपत्रांना भागिदारीचा हक्क मिळाला आहे. ह्या वृत्तसंस्थेंत आतांपर्यंत इंग्लंड, ऑस्ट्रेलिआ आणि न्यूझीलंड ह्या देशांचींच फक्त वृत्तपत्रें होतीं. अंशतः मिळालेल्या ह्या मालकी हक्काप्रमाणें संस्थेच्या बोर्डावर एक हिंदी प्रतिनिधी घेण्यांत येईल. त्याचप्रमाणें एक हिंदी ट्रस्टीही नेमण्यांत येईल.

**दिल्लींतील टेलिफोनची व्यवस्था**—दिल्लींत चालू वर्षी जवळजवळ ४,००० नवीन टेलिफोन बसविण्यांत येणार आहेत. ते बसवून झाले म्हणजे शहरांतील टेलिफोनची संख्या १३,००० इतकी होईल. गेल्या महिन्याच्या अखेर नव्या दिल्लींत २,००० नवे टेलिफोन बसविण्यांत आले. त्यापैकीं दर महिना २०० ह्या प्रमाणें तीन महिन्यांत ६०० टेलिफोन्स खाजगी व्यक्तींना देण्यांत येणार आहेत.

**गव्हर्नर-जनरलचा पगार**—हिंदचे गव्हर्नर-जनरल श्री. राजगोपालाचारिअर ह्यांनीं एक वटहुकूम काढून ग. जनरलचा पगार कमी केला आहे. त्या पगारावर प्राप्तीवरील कर आणि जादा कर हे मात्र घेण्यांत येणार नाहींत. गव्हर्नर जनरल आणि त्यांचें प्रधानमंडळ ह्यांनीं एकमतानें असें ठरविलें कीं गव्हर्नर-जनरलचा पगार वार्षिक २,५०,८०० रुपये आहे तो दरमहिन्याला ५,५०० रुपये करण्यांत यावा. पं. नेहरू ह्यांनीं जयपूर काँग्रेसच्या अधिवेशनांत पगार कपातीची ही घोषणा केली होती.

**हिंदुस्थानांतील परदेशीय भांडवल**—हिंदुस्थानांत सध्या गुंतलेल्या परदेशीय भांडवलाचा अधिकृत अंदाज ८०० कोटी रुपये ते १,१००कोटी रुपये ह्यांच्या दरम्यान करण्यांत आला आहे. त्यापैकीं अमेरिकन भांडवल ५% पेक्षां अधिक नसावें. गेल्या दोन वर्षांत सुमारें ६० ते ७० कोटी रुपयांचें भांडवल आपल्या मायदेशीं म्हणजे इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि आस्ट्रेलिआ ह्या देशांना परत पाठविण्यांत आलें. हल्लीं मात्र परदेशी भांडवलाची नवीन आवक आणि परत-पाठवणी असे दोन्हीं प्रकार दिसून येत आहेत. हिंदुस्थानांतील कांहीं परकीय कंपन्या आपल्या कामाचा पसारा वाढवीत असल्याचें आढळून आलें आहे.

**मुंबई सरकारच्या खर्चांत बचत**—मुंबई सरकारनें आपल्या खर्चांतील बाबींचे पौर्वापर्य ठरविण्यासाठी एक कमिटी नेमली होती, कमिटीनें चालू फडणिशी वर्षाच्या खर्चांत ६ कोटी रुपयांच्यावर कपात केली आहे. १६ लाख रुपयांचा खर्च अजिबात रद्द करण्यांत आला आहे. ५३ लाखांचा खर्च आगामी फडणिशी वर्षावर टाकला आहे आणि २५६ लाखांचा खर्च आणखी कांहीं काळ तहकूब केला आहे.

**आयात सल्लागार मंडळ**—हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या मालाविषयीं काय धोरण असावें ह्यासंबंधीं सरकारला सल्ला देणारें एक मंडळ नेमण्याचें ठरविलें होतें. त्या मंडळांतील सभासदांचीं नांवें आतां प्रसिद्ध झालीं आहेत. सल्लागार मंडळाची पहिली बैठक सरकारचे व्यापार मंत्री श्री. के. सी. नियोगी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १९ फेब्रुआरी रोजीं होईल असा अंदाज आहे.

**आगीचा धोका : सोईचा दुरुपयोग**—लंडनमधील रस्त्यांवर पादचारी लोकांच्यासाठी दोन्हीं बाजूला जे रस्ते असतात, त्यांवर आगीच्या धोक्याच्या सूचना देण्यासाठी तांबडे खांब बसविलेले असतात. लंडन मधील व्रात्य मुलें ह्या खांबांचा दुरुपयोग करून आगीचा खोटा धोका दर्शविण्यासाठी त्यांचा वापर करतात असें आढळून आलें आहे. लंडन कोटी कौन्सिलनें आतां हे खांब काढून टाकण्याचें ठरविलें असून आगीची वर्दी टेलिफोननें देण्याविषयीं सूचना केली आहे. मार्च १९४८ ते डिसेंबर १९४८ अखेर आगीच्या बंबांना मिळालेल्या वर्दीपैकीं ७५ टक्के खोट्या होत्या असें दिसून आलें. त्यामुळें वरील निर्णय घेणें कौन्सिलला भाग पडलें.

**५० वर्षें शिक्षा भोगल्यावर सुटका**—डोमेनिसिओ जर्मेनो नांवाच्या एका इटालिअन इसमाला अत्यंत अल्प वयांत एका गुन्ह्याबद्दल ५० वर्षें कारावासाची शिक्षा झाली होती. ती पूर्ण भोगल्यावर ट्युरीन येथील तुरुंगांतून त्याची नुकतीच सुटका झाली. तो बाहेर पडला तेव्हां ट्युरीनमधील ट्रॅम्स, बसेस, मोटारी आणि सायकली ह्यांनीं वाहणारे रस्ते त्यानें आयुष्यांत प्रथमच पाहिले. हा गृहस्थ आपल्या अर्जेंटाइनमधील नातेवाइकांना भेटण्यासाठी ७,००० मैलांचा प्रवास करून तेथें जाण्याच्या खटपटींत आहे.


# दि न्यू सिटिझन बँक
## ऑफ इंडिया, लि.

**हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई**

एकूण खेळतें भांडवल : ३,६०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १२,००,०००रु.वर

★ बँक स्ट्रीटवर ★

**३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत**

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शींव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ क्रडाक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सितावर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर (पुणें), ४६ शहापूर (बेळगांव) ४७ नामपूर (नाशिक).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजर, पुणें शाखा. (बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. ९ फेब्रुवारी, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


*" अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## मुंबई प्रांतांतील कापडाचें वांटप

हिंदुस्थान सरकारनें कापडाच्या वांटपावर पुन: नियंत्रण बसविण्याचें ठरविलें असल्यानें मुंबई प्रांताला म्हणून कांहीं ठराविक गांठी वांटपासाठी अर्थातच मिळणार आहेत. मध्यवर्ती सरकार-कडून प्रांताला मंजूर करण्यांत आलेलें कापड घेऊन, तें दरडोई वाटण्याची जबाबदारी प्रॉव्हिन्शिअल टेक्स्टाइल कंट्रोलर, मुंबई सरकारतर्फे घेणार आहे. प्रांतांतील प्रत्येक जिल्ह्याला मिळणारें कापड जिल्ह्याच्या लोकसंख्येवर अवलंबून राहील. " बॉंबे को. क्वार्टर्ली"च्या ताज्या अंकांत जॉ. रजिस्ट्रार श्री. एन. पी. भागवत, ह्यांनीं एक माहितीपूर्ण लेख लिहिला आहे. त्याचा उपयोग येथें केला आहे.

मुंबई प्रांतांत कापडाच्या उत्पादनाची मुख्य केंद्रें म्हणजे मुंबई, अहमदाबाद आणि सोलापूर हीं मोठीं शहरें होत. ह्याशिवाय बार्शी, जळगांव, हुबळी, गदग, गोकाक इत्यादि गांवींही कापड तयार होतें. सरकारनें प्रत्येक महत्त्वाच्या विक्रीच्या केंद्राच्या ठिकाणीं आपले वांटप अधिकारी नेमले आहेत. ह्या अधिकाऱ्यांनीं प्रांताच्या वाटणीचें कापड गिरण्यांपासून विकत घेऊन, जिल्ह्यांची वांटणी ठरेपर्यंत गुदामांत ठेवावयाचें आहे. प्रत्येक जिल्ह्यांत एक घाऊक संस्था राहील. त्या संस्थेनें उत्पादन केंद्राच्या ठिकाणीं जिल्ह्या-साठीं कापडाची निवड करावयाची आणि डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडून आज्ञा येईल त्याप्रमाणे किरकोळ विक्रेत्यांना कापड पुरवावयाचें अशी व्यवस्था आहे. सरकारचें धोरण असें आहे कीं, जिल्ह्याची घाऊक खरेदीदार संस्था शक्य तोंवर सहकारी बँका अथवा खरेदी–विक्री करणारे सहकारी संघ असावेत. २२ जिल्ह्यांपैकीं १५ जिल्ह्यांतून सहकारी संस्थाच जिल्हा घाऊक खरेदीदार म्हणून निवडण्यांत आल्या आहेत. त्यांपैकीं ५ जिल्ह्यांतलि मध्यवर्ती बँका, १ बँकिंग युनिअन आणि ८ खरेदी–विक्री संघ आणि १ अर्बन बँक अशा संस्था आहेत. आर्थिक दृष्ट्या मजबूत आणि कार्यक्षम अशाच जिल्हा घाऊक खरेदीदार संस्थांना जिल्ह्याच्या वांटपाचें काम देण्यांत आलें आहे. ह्या संस्थांना आपल्या विभागांतील प्रमुख वाटपदाराकडून कापड घेतांना रोख रक्कम द्यावी लागते. उत्पादनाच्या केंद्राहून कापडाचा सांठा, विभागयि वांटपदार हे जिल्हा–संस्थेनें निर्दिष्ट केलेल्या ठिकाणीं पाठवतात. प्रथम सर्व कापड जिल्ह्याच्या मॅजिस्ट्रेटकडे पाठविलें जातें. जिल्हा मॅजिस्ट्रेटकडून रेल्वेची पावती जिल्हा–खरेदीदार संस्थेकडे पाठविण्यांत येते. ह्या पद्धतीमुळें जिल्ह्याच्या वांटणीचें कापड गुप्त मार्गानें दुसरीकडे जाण्याची भीति राहत नाहीं. जिल्ह्याच्या खरेदीदार संस्थेला सरकारशीं करार करून, उभयपक्षीं ठरलेल्या अटींनुसार वांटप करावें लागतें. घाऊक खरेदीदार संस्थांना १० हजार रुपयांची रक्कम अनामत ठेवावी लागते; किरकोळ विक्री करणाऱ्यांना ५०० रुपये अनामत ठेवावे लागतात. करारांतील अटींचा भंग करण्यांत आल्यास अगर कापडाबाबतचा नियंत्रण-विषयक हुकूम पाळला गेला नाहीं तर हीं अनामत रक्कम जप्त होऊं शकते. जिल्हानिहाय घाऊक खरेदीदार संस्थेला परवाना फी, गुदामाचें भाडें, विम्याचे हप्ते, वाहतुकीचा खर्च, भांडव-लावरील व्याज इत्यादि खर्च सोसावा लागतो. सरकारनें कापडा-वरील नियंत्रण उठविल्यास त्यावेळीं जिल्हा संस्थेकडे जें कापड विकण्याचें राहिलें असेल तें सरकार परत विकत घेईल. ही परत विक्रीची किंमत जिल्हा संस्थेनें विभागीय वांटपदाराला दिलेली असेल तीच राहील. अशावेळीं जिल्हा संस्थेला १¼ टक्के कमिशन घेण्याचा अधिकार राहील. तथापि नियंत्रण निघाल्यावर सुद्धां कापड विकण्याची जिल्हा–संस्थेची इच्छा असेल तर तिला तसें करता येईल. संस्थेनें हा मार्ग पत्करण्याचें ठरविल्यास तिला विक्री-वर १½ टक्के कमिशन देण्यांत येईल.

### सहकारी संस्थांस प्राधान्य

साधारणपणें असा अंदाज करण्यांत आला आहे कीं, किरकोळ विक्रीचे कामापैकीं ७५ टक्के वांटप सहकारी संस्थांमार्फत होईल. बाकीचें वांटप प्रत्येक जिल्ह्यांतील खाजगी व्यापाऱ्यांकडे सोपवि-ण्यांत येईल. किरकोळ विक्रीकरतां सहकारी संस्थांची निवड कर-तांना ग्राहकांच्या सहकारी संस्था, अ अगर ब वर्गांतील सहकारी विक्रीसंस्था ह्यांसारख्या संस्थांना आधीं निवडलें जाईल. किरकोळ विक्रीच्या केंद्रांतून अशा संस्था नसल्या तर अर्बन क्रेडिट सोसा-यटीज आणि अर्बन बँका ह्यांना संधि देण्यांत येईल. रत्नागिरी आणि कुलाबा जिल्हे आणि विलीन झालेलीं संस्थानें ह्यांच्यांत योग्य अशा सहकारी संस्था फारशा नाहींत. त्यामुळें तेथील किर-कोळ वांटपाचें काम खाजगी व्यापार करणाऱ्यांना द्यावें लागेल. साधारण मानानें पहाता प्रत्येक तालुक्यांत ६-पेक्षां अधिक किंवा दर १५ हजार माणसामागे १-पेक्षां अधिक किरकोळ विक्रीचें दुकान असणार नाहीं. किरकोळ विक्रीचीं केंद्रें म्हणून सहकारी संस्थांची होणारी निवड आसिस्टंट रजिस्ट्रारच्या शिफारसीप्रमाणे अनुसरून डिस्ट्रिक्ट सप्लाय अँड प्राइस अॅडव्हायजरी कमिटीकडून करण्यांत येईल. जिल्ह्यां-तील घाऊक आणि किरकोळ वांटपदार ह्यांना जिल्हा मॅजिस्ट्रेटकडून परवाने घ्यावे लागतील. किरकोळ विक्री करणाऱ्यांना जास्तींत जास्त ७½ टक्के कमिशन मिळणार आहे.

मध्यवर्ती सरकारनें कापडाचें उत्पादन आणि किंमती ह्यांचे नियंत्रण केलें आहे आणि वांटपाची पद्धत प्रांतिक सरकारांच्यावर सोंपविली आहे. किरकोळ किंमती ठरवितांना प्रांतिक सरकारांना अशा सूचना देण्यांत आल्या आहेत कीं तलम आणि अतिशय तलम कापडांच्या किंमती त्यांच्या गिरण्यांतील किंमतीपेक्षा २० टक्क्यापेक्षां अधिक असता कामा नयेत. मध्यम प्रतीच्या आणि जाड्या-भरड्या कापडाच्या बाबतींत ही मर्यादा १२½ टक्के ठरवि-ण्यांत आली आहे. गिरण्यांतील कापडांच्या किंमती कापडावर घालण्यांत येणार आहेत. असा किंमतीचा शिक्का नसेल तें कापड विकता येणार नाहीं. किरकोळ विक्रीच्या किंमतीं मात्र कापडावर घालण्यांत येणार नाहींत. तथापि प्रत्येक किरकोळ विक्रीच्या ठिकाणीं एक तक्ता ठेवण्यांत येईल. ह्या तक्त्यांत गिरणींतील

किंमतीपेक्षा किती अधिक किंमत घेण्यांत येत आहे तें स्पष्टपणें दाखविण्यांत येईल.

### भांडवलाची व्यवस्था

मुंबई प्रांतांत सरकारनें प्रत्येक व्यक्तीला मिळणाऱ्या कापडाचें प्रमाण ठरवून टाकलें आहे. खेडेगांवांतील लोकांना प्रत्येक माणसामागें दरवर्षी १२ वार, साधारण मोठ्याशा गांवांत १८ वार आणि शहरांतून २० वार असें प्रमाण ठरविण्यांत आलें आहे. ज्या गांवांची लोकसंख्या १ लाखावर असेल त्यांना शहरें असें समजण्यांत येणार आहे. मुंबई प्रांतांत अशीं ९ शहरें आहेत. तीं पुढील प्रमाणें : मुंबई, अहमदाबाद, पुणें, सोलापूर, बेळगांव, नाशिक, अहमदनगर, सुरत आणि हुबळी. ज्या गांवांतून पूर्वी अन्नधान्याचें वांटप सुरू होतें, त्यांना मोठीं गांवें ह्या सदरांत घालण्यांत आलें आहे. प्रांतांतील बाकीचा भाग खेडेगांवांत धरला जाईल. जिल्ह्यांतील लोकसंख्येच्या मानानें जिल्ह्याला मिळणाऱ्या कापडाच्या गांठींची संख्या ठरविली जाईल. जिल्ह्यांतील घाऊक वांटपाचें काम अंगावर घेणाऱ्या सहकारी संस्थांना एका महिन्याचें कापड घेण्यासाठी १३१ लाख रुपये लागतील असा अंदाज आहे. जिल्ह्यांतून किरकोळ वांटप करणाऱ्या सहकारी संस्था सुमारें १,२०० तरी लागतील. ह्यांपैकीं बऱ्याच संस्थांना लागणारा पैसा, त्यांना मध्यवर्ती संस्थांकडून घ्यावा लागेल. किरकोळ विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांना एका महिन्याच्या कापडासाठी १॥ कोटी रुपये लागतील असें वाटतें. हे पैसे पुरवूं शकणाऱ्या बँकांसारख्या संस्था कापडाच्या तारणावर कर्ज देण्यापूर्वी किंमतीच्या शेकडा २० टक्के रक्कम कमी देतात, अशी त्यांची पद्धतच आहे. कापडाच्या धंद्याला लागणाऱ्या फार मोठ्या रकमा आणि जिल्हा सहकारी संस्थांच्या मार्गांतील अडचणी लक्षांत घेऊन, कर्जें देणाऱ्या संस्थांना वरील २० टक्क्यांची हमी सरकारनेंच देण्याचें कबूल केलें आहे. ह्या हमीला जास्तींत जास्त एकूण ६० लाख रुपयांची मर्यादा घालण्यांत आली आहे. एका जिल्हा—वांटपदार संस्थेसाठी जास्तींत जास्त ५० लाख रुपयापर्यंत हमी देण्यांत येईल. मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर चालणाऱ्या संस्थांना त्यांचें भांडवल, गंगाजळी इत्यादींच्या ८ पटींपेक्षा अधिक कर्ज काढतां येत नाहीं. ज्या सहकारी संस्थांनीं घाऊक वांटपाचें काम घेतलें असेल त्यांना ही मर्यादा अडचणीची ठरेल. ह्या संस्थांनीं आपल्या पोट नियमांत योग्य तो बदल करून, रजिस्ट्रारच्या संमतीनें भांडवल आणि गंगाजळी ह्यांच्या २० पट कर्जे काढण्याची सोय करून घ्यावी असें सुचविण्यांत आलें आहे. घाऊक आणि किरकोळ ह्या दोन्ही प्रकारचें वांटप करणारांनीं सेल्स टॅक्स अन्वयें स्वतःस रजिस्टर करून घ्यावयाचें आहे. त्यामुळें विक्रीवरील कर फक्त ग्राहकांवरच पडेल. ग्राहकाला किरकोळ किंमती व्यतिरिक्त विक्रीवरील करहि द्यावा लागेल. कापड वांटपाच्या कामांत सहकारी संस्थांना प्राधान्य देण्याचीं कारणें मुख्यतः दोन आहेत. एक असें कीं, सहकारी संस्थांचे संबंध गांवांतील व खेड्यांतील ग्राहकांशीं चांगले निगडित असतात. सहकारी संस्था नफा मिळविण्याच्या दृष्टीनें काम करीत नसतात हें दुसरें कारण होय. ह्या सहकारी संस्थांपैकीं पुष्कळांनीं नियंत्रणाच्या काळांत वांटपाचें काम केलेलें आहे. त्यांना त्या अनुभवाचा फायदा आतां मिळूं शकेल.

वरील विवेचनावरून कापड वांटपाच्या सरकारी नियोजित धोरणाची कल्पना येईल. प्रत्यक्ष योजना झाल्यानंतर आलेले अनुभव लक्षांत घेऊन, वरील धोरणांत फरक होण्याचा बराच संभव आहे, हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे. मध्यवर्ती पैसा पुरविणाऱ्या संस्थांना प्राथमिक वाटप संस्थांस किती पैसा पुरवतां येईल, ह्यास मर्यादा आहे आणि ह्यापुढें नव्या प्राथमिक संस्थांना स्वतःच सर्व भांडवल उभारतां आलें, तरच नियोजित योजनेप्रमाणें त्यांचेकडे तें काम देणें शक्य होईल, असा रंग दिसत आहे.

## साखरेचें जागतिक उत्पादन

१९४८–४९ मधील साखरेचें उत्पादन विक्रम करणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. बीट–साखरेचें उत्पादन मात्र अद्याप युद्धापूर्वी-इतकें होऊं लागलेलें नाहीं. विशेषतः जर्मनींतील साखरेचें उत्पादन बरेंच मागें पडलें आहे. तथापि, उसाच्या साखरेचें उत्पादन मात्र वाढलें आहे. त्यामुळें साखरेचें एकूण उत्पादनहि सुधारलें आहे. क्युबानें १९४७–४८ मध्यें युद्धापूर्वीच्या मानानें दुप्पट साखर तयार केली. ब्राझीलनेंहि उत्पादन वाढविलें. तथापि, फिलिपाइन्स, फोर्मोसा, जावा, इत्यादि देशांचें उत्पादन फारच कमी झालें आहे. जावा हा देश साखर निर्मितींत अग्रेसर होता; त्याचें उत्पादन अगदींच कमी झालें आहे. हिंदी साखरेचें उत्पादन कमी झालेलें नाहीं. जागतिक उत्पादनाचे मानानें जागतिक उठाव होण्याचा संभव नाहीं, ह्याचें प्रमुख कारण हुंडणावळ मिळण्याची अडचण हें आहे. खालील तक्त्यांत बीट–साखर व ऊंस–साखर ह्यांच्या उत्पानाचे देशवार तुलनात्मक आंकडे दिले आहेत:—

### तुलनात्मक आकडे

(आकडे हजार टनांचे)

| बीट-साखर | १९३७-३८ | ४६-४७ | ४७-४८ | ४८-४९ (अंदाज) |
|---|---|---|---|---|
| जर्मनी | २,२१३ | ९८४ | ७७२ | ... |
| झेकोस्लोव्हाकिया | ७४१ | ५९२ | ३५० | ... |
| फ्रान्स | ९६९ | ७५० | ६५० | ... |
| ग्रेट ब्रिटन | ४२६ | ६०० | ४५७ | ... |
| रशिआ | २,५०० | १,५०० | २,५०० | ... |
| अमेरिका | १,२३२ | १,३९६ | १,६८४ | ... |
| एकूण (इतर देश धरून) | ११,०५४ | ८,२२१ | ८,८०९ | १०,४२२ |
| **ऊंस-साखर** | | | | |
| क्युबा | ३,०१८ | ५,७५८ | ६,००८ | ५,४०० |
| सॅन डॉमिनगो | ४१९ | ४५४ | ४१५ | ४३० |
| अमेरिका | ४०८ | ३८० | ३५० | ... |
| हवाई | ८२० | ७७९ | ८४५ | ... |
| पोर्टोरिको | ९६२ | ९७१ | ९२८ | ... |
| फिलिपाइन्स | ९४० | ७० | ३७३ | ६४५ |
| ऑस्ट्रेलिया | ८१० | ५३२ | ५८४ | ९०० |
| ब्राझील | ९८५ | १,३२० | १,३०० | १,४०० |
| हिंदुस्थान-पाकिस्तान | | | | |
| साखर | १,१८० | १,१०० | १,२०० | ... |
| गूळ | २,०६० | २,१०० | १,९०० | ... |
| जावा | १,३८० | ८ | १०० | ३०० |
| फोर्मोसा | १,१५२ | ६० | २८७ | ... |
| ब्रि. वेस्ट इंडीज | ४०१ | ४५२ | ४३९ | ५८५ |
| मॉरिशस | ३१४ | २८८ | ३४५ | ३७० |
| एकूण (इतर देश धरून) | १८,०६३ | १७,७५६ | १६,६६८ | १९,७६३ |
| एकूण साखर | २९,११७ | २५,९७७ | २७,४७७ | ३०,१८५ |

# मॅनेजिंग एजन्सींतील अंतःकलहाचा परिणाम

## एजन्सी रद्द होऊं शकते.

### कंपनी कायद्याखालील विवेचन

( लेखकः—श्री. स. वा. वातार, बी. एससी., एलएल. बी. )

आर्ट कॅलेन्डर लि. च्या दाव्यांतील एका मुद्याचा परामर्श "अर्थाच्या" ता. १२ जाने.च्या अंकांत घेतला होता. कायद्याचा आणखी मुद्दा त्यांत असा निघाला होता कीं, मॅनेजिंग एजन्सीच्या भागीदारांमध्यें अंतःकलह उत्पन्न झालेले असतील, तर त्यांचे निमित्तानें कंपनीस मॅनेजिंग एजन्सीचा करार रद्द करतां येईल काय ?

मॅनेजिंग एजन्सीच्या करारांत ठरलेली सामान्यपणें वीस वर्षांची मुदत संपली नाहीं, तोंपर्यंत मॅनेजिंग एजन्सीचा करार रद्द करून मॅनेजिंग एजंटांना कंपनी कामावरून काढून टाकूं शकणार नाहीं, अशी तरतूद करून ठेवलेली असते; व तिला अपवाद सर्वसाधारणपणें एवढाच ठेवलेला असतो कीं, मॅनेजिंग एजंटांचे कंपनीच्या प्रत्यक्ष कारभारांत अप्रामाणिक वर्तन वा कपटाचरण न्यायालयांत सिद्ध झाल्यास मात्र मॅनेजिंग एजंटांना दूर करतां यावें. अशा स्वरूपाच्या मॅनेजिंग एजन्सीच्या करारावरून, मॅनेजिंग एजंट हे विशेष प्रकारच्या सुरक्षित व अढळ भूमिकेवर अधिष्ठित झालेले दिसतात. परंतु, कंपनी व मॅनेजिंग एजंट यांच्यांतील वरील कराराचें स्वरूप हें सर्वसामान्य मालक व नोकर यांच्यांतील नोकरीच्या करारासारखेंच कायद्यामध्यें समजलें जातें.

नोकरीचा कोणताहि करार हा मालकाचे विशिष्ट काम यथायोग्यपणें पार पडावें ह्यासाठीं केलेला असतो. कराराच्या या मूलभूत हेतूलाच बाध येईल असें कोणतेंहि वर्तन नोकराकडून घडून आल्यास करारांतील अटी कांहींहि असल्या तरी मालकास तो करार बाजूस सारता येतो. मात्र, अशा प्रत्येक प्रकरणांत त्यांतील विशिष्ट वर्तन व त्यापासून नोकर ज्या कामासाठीं नेमलेला असेल त्याच कामास प्रत्यक्षपणें धोका आल्याचें अथवा तसा धोका निश्चितपणें येईल असा दृढ संभव असल्याचें सिद्ध होणें आवश्यक असतें.

मॅनेजिंग एजंट नेमतांना त्यांच्यांत झगडे होऊन कंपनीचें काम त्यांच्यांतील डावपेंचामुळें वा रुसव्याफुगव्यामुळें अडून पडावें अशी कांहीं कोणत्याहि कंपनीची अपेक्षा नसते. तेव्हां, मॅनेजिंग एजन्सीच्या भागीदारांत वा अन्य घटकांत अंतःकलह सुरू झाले व त्यामुळें कंपनीची त्यांचेवर असलेल्या कामाची जबाबदारी त्यांचेकडून चोखपणें बजावली जाण्यास प्रतिबंध येऊं लागले आणि त्यामुळें कंपनीच्या कामास प्रत्यक्ष धोका उत्पन्न झाला अथवा धोका येण्याचा दृढ संभव दिसूं लागला, तर कंपनीला मॅनेजिंग एजंटांतील अंतःकलहाबद्दल त्यांना कामावरून दूर करण्याचा अधिकार निःसंशय प्राप्त होतो. मग मॅनेजिंग एजन्सीच्या करारांत मॅनेजिंग एजंटांना दिलेलीं संरक्षणें कांहींहि कां असेनात; त्यांचा अडथळा कंपनीस येऊं शकत नाहीं.

ह्या मुद्यावरील प्रिव्ही कौन्सिलचा अधिकृत निवाडा मोरारजी विरुद्ध सोलापूर मिल्स हा असून तो ४६ बॉम्बे लॉ रिपोर्टर ३२४ अथवा ए. आय्. आर. १९४४ प्रिव्ही कौन्सिल १७ ह्या ठिकाणीं दिलेला आहे.

—x—


## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक्-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर



उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

## ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादिसाठीं चौकशी कराः—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५११

### औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्
( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )

( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. )

( ३ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
( ले.:—आर. एम. तळपदे, किं. १२ आ. )

## आपल्यापुढील कांहीं प्रश्न

### कारखाने, किंमती आणि रोकड

प्रथमच हें सांगितलेलें बरें कीं व्यापारांतील आणि कारखाने-गिरण्यांतील युद्धकाळांत जमा झालेलें खेळतें भांडवल—रोकड पैसा—झपाट्यानें कमी होत आहे.

युद्धोत्तर नवीन यंत्रसाधनें मिळण्यांत अडचण असूनही ही स्थिति निर्माण झालेली आहे. अथावत् यंत्रसामुग्रींत हें भांडवल गुंतविलें आहे असें नाहीं.

युद्धकालांतील डायरेक्टरांच्या वार्षिक अहवालांत प्रामुख्यानें नोंद केलेली 'कंपन्यांची भरभक्कम आर्थिक स्थिति' 'भरपूर रोकड व गुंतवण' आतां अभावानें जाणवते.

एवढेंच नव्हे तर कित्येक कंपन्यांची बँकेंतील शिल्लक संपत आली असून, कांहीं तर ओव्हरड्राफ्टवर जगत आहेत. या बदलत्या परिस्थितींत लहान आणि मध्यम आकाराचेच कारखाने-व्यापारी सांपडले आहेत असें नाहीं; तर आठ-नऊ महिन्यांपूर्वी लक्षावधि रुपयांची शिल्लक बाळगणाऱ्या मोठ्याल्या कंपन्यांचीही रोकड पैशांकरितां अशीच स्थिति आहे.

चढलेल्या किंमतींत वाढत्या व्यापाराकरितां लागणारी रोकड त्यांचेपाशीं नाहीं.

युद्धपूर्वकाळांतील उत्पादन आजही (चढ किंमतींनें) करावयाचें तर बँकांना आणखी किती तरी रक्कम व्यापारधंद्यांना द्यावी लागेल.

वाढलेल्या किंमतीबरोबरच नियंत्रणें व सरकारी कर यामुळें कारखान्यांना भरपूर रिझर्व फंड काढता आले नाहींत. इमारती, यंत्रें इत्यादींवरील घसारा फक्त मूळ किंमतीवर आकारण्याची परवानगी, तर प्रत्यक्ष नवीन इमारत बांधण्याकरितां, यंत्रसामुग्री खरेदी करण्यास दुप्पटतिप्पट खर्च येत आहे.

कंपन्यांच्या वार्षिक नफ्यांतून या गोष्टी करावयाच्या तर निव्वळ नफ्याची रक्कम तेवढी मोठी नाहीं—पुरेशी पडणारी नाहीं.

वरील कारणांनीं, विशेषत: महागाईनें, रोकड रकमेची टंचाई भासत आहे.

किंमती उतरल्या तरी त्या १९३८ च्या किंमतीपर्यंत घसरणार नाहींत. युद्धोत्तर, युद्धपूर्व किंमती राहात नाहींत असा अनुभवच आहे.

उलट, उतरत्या किंमतींचा परिणाम कारखान्यांतील व व्यापाऱ्यांजवळील पक्क्या मालाच्या किंमतीवर होऊन रोकड रकमेला अधिकच मागणी राहील.

एकंदरीत रंग असा दिसतो कीं पुढील कांहीं काळांत दैनंदिन व्यवहाराकरितां, प्रसंगीं यंत्रखरेदीकरितां वगैरे, कारखानदारांना रोख रकमेची निकड राहील आणि अशा वेळीं बँकांना त्यांचे मदतीला जाऊन उत्पादन चालू ठेवण्याचे महत्त्वाचे कार्यांत भाग घ्यावा लागेल.

वरील परिस्थिति ब्रिटिश व्यापार व कारखाने याबाबतची असून ती मीं मँचेस्टरच्या डिस्ट्रिक्ट बँकेच्या त्रैमासिकांतील एका लेखामधून घेतली आहे.

—संजय

**चंबळ नदीवरील धरण**—चंबळ नदीवर बांधण्यांत येणाऱ्या धरणासाठीं मध्यभारत संघ-सरकारनें ९ कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे, असें कळतें.

उद्बोधक विचार

## रहात्या घरांचा प्रश्न सोडविण्यास खासगी भांडवलाचा उपयोग झाला नाहीं

"हिंदुस्थानाची वाढती लोकसंख्या आणि आर्थिक दुःस्थिति, ह्यामुळें तेथील लोकांना रहाण्याच्या घरांचा अत्यंत तुटवडा भासत आहे. ही अडचण तीव्र होण्याचीं प्रमुख कारणें अशीं आहेत:—(१) युद्धाचा परिणाम: सर्व शक्ति अन्नाच्या उत्पादनांत खर्चावी लागली, (२) जुन्या घरांची जागा नवीं घरें घेऊं शकलीं नाहींत, (३) फाळणीमुळें अशांतता होऊन पंजाब, सरहद्द प्रांत व सिंध ह्यांतून सुमारें १ कोटी लोकांना घरें-दारें सोडून बाहेर पडावें लागलें आणि (४) कायद्याचा उपयोग करून घरें बांधविण्याचे कामीं सरकारी धोरण निष्प्रभ होतें.

"खासगी भांडवल गुंतविणारांनीं खऱ्या अडचणी दूर करण्याऐवजी, मोठीं भाडीं देणारांची सोय पाहिली आणि ज्यास्त उत्पन्नदारांना घरें बांधून दिलीं आणि ज्यांचा रहाण्यासाठीं उपयोग नाहीं, अशा कचेऱ्यांच्या इमारती व सिनेमा थिएटरें त्यांनीं उभारलीं. युद्धामुळें रहाण्याच्या घरांचा प्रश्न तीव्रतर झाला असला, तरी त्यापूर्वीहि फक्त ४% हिंदी लोक बऱ्या म्हणता येण्याजोग्या बिऱ्हाडांतून रहात असत."—यु. ने. सो. अफेअर्स खात्याचा अहवाल.

### विटें येथील को. सेक्रेटरी ट्रे. क्लासचा उद्घाटन समारंभ

सातारा जि. को. सु. युनियन बोर्डाच्या एजु. कमिटीच्या विद्यमानें विटें येथें को. सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा उद्घाटन समारंभ ता. १५-१-१९४९ रोजीं दुपारीं तीन वाजतां फुलचंद शहा याचे इमारतीमध्यें दे. भ. आमदार एल. बी. भिंगारदेवे, बी. ए., एलएल. बी. यांचे हस्तें मोठ्या थाटानें पार पडला. सदर समारंभाच्या प्रसंगीं मे. ॲडिशनल. डि. को. ऑफिसर, मे. बँक इन्स्पेक्टर शाखा विटा, दे. भ. आवळे इत्यादि वक्त्यांचीं भाषणें झालीं. शेवटीं अध्यक्षसाहेब यांनीं आपल्या भाषणांत सहकारी चळवळीचें भावी स्थान सहकारी जीवनाची व्यापकता याविषयीं माहिती दिली व अशाच तऱ्हेचे वेळोवेळीं सहकारी को. सेक्रेटरी शिक्षण वर्ग चालूं केलेस सहकारी चळवळ भक्कम व खंबीर पायावर खात्रीनें उभी राहून चळवळीमार्फत देशाची सर्वांगीण उन्नति होईल अशी आशा व्यक्त केली. शेवटीं सातारा जि. को. सु. यु. बोर्डाच्या एज्यु. कमेटीच्या तर्फे श्री. डी. बी. निकम, को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर, सातारा यांनीं अध्यक्षांचे व इतर पाहुण्यांचे आभार मानल्यानंतर समारंभ समाप्त झाला.

**हिंदच्या शेतकीची वाढ**—हिंदुस्थान सरकारनें आंतरराष्ट्रीय बँकेकडून १५० कोटी रुपयांच्या कर्जाची मागणी केली आहे. हें कर्ज शेतीच्या वाढीसाठी घेण्यांत येणार असून त्यांपैकी कांहीं रक्कम १,००० मोठे यंत्रचलित नांगर आणि १,४०,००० लहान यांत्रिक नांगर ह्यांच्या खरेदीवर खर्च व्हावयाचे आहेत. बहुतेक नांगर अमेरिकेंतूनच विकत घेतले जातील. ह्या नांगरांचा उपयोग करून येत्या सहा वर्षांत ४२ लाख एकर पडीक जमीन लागवडीखालीं आणण्याची सरकारी योजना आहे. इतकें करूनही पडीक जमिनीपैकीं एक दशांश जमीनच पिकविण्यासाठीं उपयोगांत आणली जाईल. युद्धापूर्वी हिंदुस्थानाला दरवर्षी २० लाख टन धान्य कमी पडत असें. त्याची भरपाई वरील योजनेमुळें होईल असा अंदाज आहे.

## बँकिंग कंपनीज बिलावरील सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट

| बिलांतील तरतूद | सिलेक्ट कमिटीची शिफारस |
|---|---|
| ( १ ) नव्या ( १ जानेवारी १९४८ नंतर निघालेल्या ) बँकांनीं ९% पेक्षा जास्त डिव्हिडंड देऊं नये. | ( १ ) बँकांसाठी स्वतंत्र तरतूद नको. सर्वच कंपन्यांचें डिव्हिडंड आतां नियंत्रित झालेंच आहे. |
| ( २ ) बँकांनीं बिगर-बँकिंग कंपन्यांवर ताबा मिळवूं नये ह्यासाठी बँकांना इतर कंपन्यांच्या भागापैकी २०% पेक्षा अधिक भाग धारण करतां येऊं नयेत. कंपनी कायद्याप्रमाणें, बँका अशा रीतीनें ४०% पर्यंत भाग घेऊं शकतात. | ( २ ) बँकांना बिगर-बँकिंग कंपन्यांचे ४०% पर्यंत भाग धारण करण्याची परवानगी असावी. ही मर्यादा २०% पर्यंत उतरविल्यानें बँकांच्या वाजवी धंद्यास आडकाठी येईल. |
| ( ३ ) कोणत्याहि एका भागदारास, सर्व भागदारांच्या मिळून एकूण मतांच्या १०% पेक्षा जास्त मतें असूं नयेत. | ( ३ ) १५ जानेवारी, १९३७ पूर्वी स्थापन झालेल्या बँकांना हें लागूं करूं नये. |

बँकिंग कंपनीच्या मालकींत आलेल्या स्थावर मालमत्तेची विल्हेवाट तिनें ७ वर्षांत लावलीच पाहिजे, अशी सिलेक्ट कमिटीची सूचना आहे. बँकेलाच त्या मालमत्तेची गरज असेल, तर गोष्ट वेगळी.

### सभासदांच्या भिन्नमतपत्रिका

सिलेक्ट कमिटीचे एक सभासद, श्री. कृष्णमाचारी ह्यांनीं आपलें मत नमूद करून सांगितलें आहे कीं, कोणत्याच भागदारास एकूण मतांच्या २½% पेक्षा जास्त मतें असूं नयेत. हा नियम नव्याप्रमाणें जुन्याहि बँकांवर बंधनकारक असावा. मूळ बिलांतील डिव्हिडंडवरील नियंत्रण कायम ठेवावें.

श्री. अनंतशयनम् अय्यंगारांनाहि हें नियंत्रण कायम हवें आहे. कायद्याच्या कक्षेंतून एखाद्या बँकेस वगळण्याचा अधिकार सरकारला आहे, तो नसावा असें त्यांनीं सुचविलें आहे.

प्रो. के. टी. शहा ह्यांना बँकिंगच्या धंद्याच्या राष्ट्रीयीकरणाची तरतूद आतांच करून हवी आहे. सरकारला बँका ताब्यांत घेऊन त्या सुलभतेनें चालविता याव्या, ह्यासाठी बिलांत दुरुस्ती करावी असें त्यांचें म्हणणें आहे.

---

### युनायटेड वेस्टर्न बँकेची पुणें शाखा

युनायटेड वेस्टर्न बँक लि. ( सातारा ) च्या पुणें शाखेची ऑफिसची जागा वाढत्या व्यवहारास अपुरी पडूं लागल्याकारणानें तिचें भालेराव बिल्डिंग, ढमढेरे बोळ, श्रीकृष्ण सिनेमासमोर, येथें ता. ५ फेब्रुवारी रोजीं रथसप्तमीचे सुमुहूर्तावर स्थलांतर करण्यांत आलें. श्री. अण्णासाहेब चिरमुले हे बँकेचे चेअरमन असून श्री. सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम, हे मॅनेजर आहेत. पुणें शाखेची व्यवस्था श्री. मा. भा. क्षीरसागर ह्यांचेकडे आहे. बँकेची स्थापना १९३६ सालीं झाली व तिची पुणें शाखा १९४० मध्यें कै. प्रो. वा. गो. काळे ह्यांचे हस्तें उघडण्यांत आली. बँकेचें खेळतें भांडवल ९० लक्ष रु. असून त्यापैकी ५ लक्ष रु. वसूल भांडवल व १,३१,००० रु. रिझर्व व इतर फंड आहे. १९४८ सालीं तिला ५८ हजार रु. नफा झाला.

### बेळगांव बँक लि. शेड्यूल्ड बँक झाली

दि बेळगांव बँक लि. हिला रिझर्व्ह बँक कायद्याप्रमाणें शेड्यूल्ड बँक म्हणून नुकतेंच दाखल करून घेण्यांत आलें आहे, ह्याबद्दल आम्ही बँकेचें व तिच्या चालकांचें अभिनंदन करतों. बेळगांव बँकेची स्थापना १९३० सालीं झाली. तिच्या २२ शाखा असून तिचें खेळतें भांडवल ६६ लक्ष रु. आहे. वसूल भांडवल ५ लक्ष रु. असून फंडाची रक्कम सुमारें १ लक्ष रु. आहे. गेल्या वर्षी बँकेस ४७,५६६ रु. निव्वळ नफा झाला होता. ती ६¼% करमाफ डिव्हिडंड सतत देत आहे. बँकेला १ लक्ष रु. चे नवे शेअर्स विक्रीस काढण्याची नुकतीच परवानगी मिळाली आहे.

---

### श्री. वर्दे ह्यांचा सन्मान

महाराष्ट्र बँकेचे आतांपर्यंतचे उपाध्यक्ष व एक संस्थापक-डायरेक्टर श्री. वामनराव वर्दे यांची रिझर्व्ह बँकेच्या मुंबई स्थानिक बोर्डावर सरकारकडून नेमणूक झाल्याचें वृत्त प्रसिद्ध झालेंच आहे. त्यांच्या ह्या नेमणुकीबद्दल बोर्ड ऑफ डायरेक्टर्सतर्फे त्यांचें अभिनंदन करण्याकरितां रविवार दि. १३ फेब्रुवारी, १९४९ रोजी सायंकाळीं ५ वाजता गोखले हॉलमध्यें समारंभ होणार आहे. नेक ना. डॉ. बाबासाहेब जयकर, यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें मान्य केलें आहे.

---

### सावकारी करणाऱ्या कंपन्यांनीं परवाना घेतलाच पाहिजे

१९४८ च्या दुरुस्ती—कायद्याप्रमाणें नुकताच दुरुस्त केलेला १९४६ चा मुंबई सावकारी—कायदा १८ नोव्हेंबर १९४८ पासून मुंबई प्रांतांत लागू झाला आहे. या कायद्यानुसार, कायद्यांत नमूद केलेल्या, सावकारीचा धंदा करणाऱ्या आणि आतांपर्यंत परवान्याची सूट दिलेल्या सर्व कंपन्यांना ( शेड्यूल्ड बँका, कोऑपरेटिव्ह सोसायट्या आणि सोसायटी रजिस्ट्रेशन कायद्यान्वयें नोंदलेल्या संस्था वगळून ) यापुढें परवाना घेतल्याशिवाय सावकारी धंदा करतां येणार नाहीं. त्यांनीं तातडतोब सावकारी आसिस्टंट रजिस्ट्रारकडे परवान्यासाठी अर्ज करावेत. परवाना न घेतां त्यांनीं धंदा बेकायदेशीरपणें चालूं ठेवला तर त्यांच्यावर कायदेशीर इलाज करतां येईल.

---

### बँकेची नवी व्याख्या

"तुम्हांला पैशाची खरोखर गरज नाहीं, असें सिद्ध केलें म्हणजे जी पैसे देते, तिला बँक असें म्हणतात." जो ई. लुई.


ता. ३१ जानेवारी १९४८ नंतर निर्माण झालेल्या
अशांततेच्या परिस्थितीमुळें वर्षभर बंद ठेवणें भाग पडलेलें
सर्वांचें आवडतें
संकलनात्मक अभिनव मासिक
महाद्वार
संपादक : त्र्यं. न. कुलकर्णी
पुनर्जन्म अंक
ता. २० फेब्रुवारीस निघत आहे

महाद्वारच्या सर्व जुन्या वर्गणीदारांना हा अंक भेटीदाखल पाठविला जाईल. त्यांनीं आपले पत्ते तातडतोब कळवावेत.

या अंकाची किंमत ६ आणे
वार्षिक वर्गणी पांच रुपये
जाहिरातदारांनीं त्वरा करावी
एजंटसनीं पत्रव्यवहार करावा
महाद्वार प्रेस ... ... ... ... कोल्हापूर

## चार टक्के व्याजाचा दर ठरविणारी पहिली सहकारी बँक

### पू. खा. जिल्हा सहकारी बँकेची आघाडी

"श्री. बी. पी. पटेल आय्. सी. एस., सहकारी संस्थांचे रजिस्ट्रार व डायरेक्टर ऑफ रूरल फायनान्स व अग्रि. मार्केटिंग मुंबई इलाखा ह्यांनीं ता. २३–१–४९ रोजीं चार वाजतां पू. खा. जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेस भेट दिली. भेटीचे वेळीं बँकेचे चेअरमन श्री. बी. डी. देशमुख, बी. ए., एलएल. बी., एम्. एल. ए. व बोर्डाचे इतर सभासद हजर होते. त्यांच्याशीं विचारविनिमय करून अग्रिकलचरल क्रेडिट ऑर्गनायझेशन कमिटीच्या रिपोर्टावरील मुंबई सरकारचा मुलकी खात्याचा ठराव नं. २१४८–४५ ता. १२ मार्च १९४७ नें काढण्यांत आलेले हुकुमांतील पॅरा नं. १५ मध्यें व्याजाचे दराबाबत सदर कमिटीनें केलेल्या शिफारशीनुसार आपल्या संलग्न झालेल्या संस्थांना द. द. शेंकडा चार टक्के व्याजाच्या दरानें कर्ज देण्याबद्दलचा निर्धार पू. खा. जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेनें केला आहे. हल्लीं ही बँक शेतकऱ्यांना कर्जांचा पुरवठा, सहकारी संस्थांच्या मार्फत चार टक्के व्याजाच्या दरानें करीत आहे. ह्यापुढें म्हणजे १९४९–५० सालाकरतां यावयाचें कर्ज चार टक्के व्याजाच्या दरानें देण्याबद्दल तिनें आतां ठराव केला आहे. अशा प्रकारें नानावटी कमिटीच्या शिफारशीप्रमाणें व्याजाचा चार टक्के दर ठरविणारी ही मुंबई इलाख्यांतील पहिलीच सहकारी मध्यवर्ती बँक आहे.

" जिल्ह्यांतील शेतकऱ्यांकडून चालवलेली ही एक मुंबई इलाख्यांतील मध्यवर्ती बँकांपैकीं एक प्रमुख मध्यवर्ती बँक असून, हिचें हल्लींचें खेळतें भांडवल दोन कोटी सतरा लक्ष रु इतकें आहे व तिचें स्वतःचें भांडवल जवळ जवळ तेवीस लाखांचें आहे. ठेवी वगैरे रूपानें तिनें उभारलेलें भांडवल एक कोटी अठावन्न लक्ष इतकें आहे. गेल्या वर्षी सहकारी संस्थांना नेहमींचें साधें व सीझनल फायनान्स मिळून सत्तेचाळीस लाखापर्यंत कर्ज देण्यांत आले होते. पैकीं १५ जानेवारी, १९४९ अखेर तीस लाख इतकें कर्ज रोख वसूल झालें आहे. वसुलीचें प्रमाण सर्वसाधारण दोन्ही प्रकारचें कर्ज मिळून शेंकडा प्रमाण ६२ टक्के इतकें आहे. अशा प्रकारें आतांपर्यंत बँकेचें कामकाज सर्व दृष्टीनें चांगल्याप्रकारें चालल्याचें पाहून रजिस्ट्रार साहेब यांनीं समाधान व्यक्त केलें. तसेंच नानावटी कमिटीच्या शिफारशीप्रमाणें चार टक्के व्याजाच्या दरानें सहकारी संस्थांना भांडवलाचा पुरवठा करण्याकरतां ही बँक धडाडीनें इतर संस्थांचे अगोदर पुढें आल्याबद्दल व अशा रीतीनें स्वतः मार्गदर्शक पाऊल टाकल्याबद्दल तिचें अभिनंदन केलें. आतां लौकरच पुढील वर्षाकरतां यावयाचें कर्ज देण्यास सुरवात होईल."

## पेटन्ट चौकशी समिति

### दि. ब. पै ह्यांचेशीं विचारविनिमय

हिंद सरकारनें पेटन्ट कायदा-दुरुस्तीसंबंधीं नेमिलेल्या समितीनें प्रसृत केलेल्या प्रश्नपत्रिकेसंबंधीं विचारविनिमय व चर्चा करण्याकरितां दिवाण बहादूर के. रामा पै, समितीचे चिटणीस, हे महत्त्वाच्या शहरांना भेट देणार आहेत. फेब्रुवारी १९४९ च्या शेवटच्या आठवड्यांत त्यांचा मुक्काम पुणें येथें होईल. तरी येथील व्यापारी, कारखानदार, वकील, प्राध्यापक, संशोधक, इत्यादींनीं त्यांच्याबरोबर विचारविनिमय व चर्चा केल्यानंतरच प्रश्नपत्रिका भरून पाठविणें इष्ट होईल, अगोदर पाठवूं नये, अशी लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक-संग्रहालयाच्या क्यूरेटरांची विनंति आहे.


### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१. बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार










### दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## हिंदपुढील प्रचंड विधायक कार्य

( अमेरिकन संयुक्त संस्थानांचे हिंदुस्थानांतील वकील ऑनरेबल हॉय् डब्ल्यू. हेंडरसन ह्यांनीं दिनांक १२ जानेवारी रोजीं बनारस हिंदु युनिव्हर्सिटीमध्यें जें व्याख्यान दिलें त्यांत अमेरिकन व हिंदी स्वातंत्र्यप्राप्तीचे वेळेच्या काळासंबंधीं उदबोधक उद्गार काढले आहेत. पुष्कळ वेळां मुत्सद्यांचे शब्द हे द्व्यर्थी असतात. जी गोष्ट प्रथम करावी अथवा व्हावी असें वाटत असेल ती तशी प्रथमतः केली जातच आहे असें उगाचच म्हणून आपला विचार सुचविण्याची मुत्सद्यांची एक पद्धति आहे. कदाचित् त्याच पद्धतीचा अवलंब हेंडरसन यांनीं ह्या ठिकाणीं स्वीकारलेला असूं शकेल. हिंदच्या पुढाऱ्यांनीं तातडीच्या कार्याकडे आपलें लक्ष आधीं पुरवावें, असेंच कदाचित् त्यांना सुचवावयाचें असूं शकेल. )

### मि. हेंडरसनकृत परिस्थितीची छाननी

" स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अमेरिकन लोकांपुढें जीं कामें होतीं त्यांच्या मानानें नवोदित हिंदी राष्ट्राच्या प्रजाजनांपुढें सध्यां वाढून आलेल्या जबाबदाऱ्या अपरिमित मोठ्या व अवघड आहेत यांत संशय नाहीं. भविष्यकालासाठीं कार्ययोजनांची आंखणी करीत असतांनाच हिंदच्या पुढाऱ्यांना आपल्या लाखो देशबांधवांच्या हालअपेष्टांचें निराकरण करण्याचा प्रश्न विशेष निकडीनें विचारांत घ्यावा लागत आहे. हिंदचे लाखो प्रजाजन अर्धपोटी असून चिंध्या पांघरून दिवस कंठीत आहेत. कित्येकांना घरेंदारें नाहींत तर कित्येकांना लागवडीयोग्य शेतजमीन मिळूं शकत नाहीं. या अडचणी दूर करावयाच्या तर देशाचें उत्पादन वाढविलें पाहिजे. सुसंगत व योजनाबद्ध कार्य अंगावर घेऊन तें यशस्वी रीतीनें पार पाडल्याशिवाय उत्पादनांत वाढ होणार नाहीं, ह्या गोष्टीची हिंदच्या पुढाऱ्यांना जाणीव आहे. ह्या कार्याची जशी निकड हिंदच्या पुढाऱ्यांचे मागें आहे तशी ती अमेरिकन लोकांपुढें स्वातंत्र्याच्या उदयकालीं मुळींच नव्हती. ह्या कार्यासाठीं जलविद्युत् व अन्य प्रकारच्या विद्युन्निर्मितीचीं केंद्रें उभारून विस्तीर्ण पडजमिनी शक्य तितक्या लवकर लागवडीखालीं आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ताबडतोब नवे रस्ते बांधून व अन्य प्रकारांनींहि वहातुक व दळणवळण पद्धती ह्यांच्यांत सुधारणा करण्याचा आणि नवे कारखाने व नव्या गिरण्या काढून आणि नवीन खाणी सुरू करून सध्यां अत्यावश्यक उत्पादक यंत्रसाहित्याची व उपभोग्य मालाची निपज करण्याची त्यांची इच्छा आहे. सध्यां लागवडीखालीं असलेल्या जमिनींमधील पिकांचा उतारा वाढावा; विद्यमान कारखान्यांचें उत्पादन वाढावें आणि विद्यमान यंत्रसामुग्री, वाहतुकसाहित्य आणि दळणवळण मार्ग ह्यांचा वापर अधिक परिणामकारक रीतीनें व कौशल्यानें व्हावा ह्या गोष्टी त्यांना आवश्यक आहेत. अशीं हीं विविध व महत्त्वाचीं कामें पार पाडण्यासाठीं सहाय्यभूत होतील असे अर्थज्ञ, शासनशास्त्रज्ञ व तंत्रज्ञ हिंदी तरूण तांतडीनें तयार व्हावेत म्हणून त्यांना शिक्षण देण्यावर त्यांचा भर आहे. आधुनिक विज्ञानशास्त्र, तंत्रपद्धति, यंत्रसामुग्री, ज्ञानभांडार व सुसंघटित आणि योजनाबद्ध अर्थव्यवस्था ह्यांचा जो अपूर्व लाभ ह्या कामीं नवोदित हिंद राष्ट्रास मिळत आहे तसा तो अमेरिकनांना त्यांच्या राष्ट्राच्या प्रारंभकालीं मिळालेला नव्हता. तरीहि परंतु हिंदच्या राष्ट्रनेत्यांपुढें जें प्रचंड कार्य आव्हानपूर्वक येऊन ठाकलें आहे तें खरोखरच गंभीर स्वरूपाचें व भीमकाय आहे, ह्यांत संशय नाहीं ! "

---

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★
९६ नारायण पेठ, पुणें २.

कृष्णा शुगर मिल्स लि.
कृष्णा–कित्तूर
कन्फेक्शनरी सुरू झाली.
धंद्याच्या वाढीसाठीं ठेवी स्वीकारल्या जातात.
६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.
विशेष माहितीसाठीं लिहा.
पोस्टः–कृष्णा–कित्तूर जिल्हाः–बेळगांव.
विंचूरकर ॲण्ड को. मॅनेजिंग एजण्टस्.

बँक ऑफ पूना लि.
– शेड्यूल्ड बँक –
अधिकृत भांडवल ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल २५,००,०००
वसूल भांडवल १२,५०,०००
संचालक मंडळ
१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया–चेअरमन, २ शेठ डी. आर. नाईक, जे. पी. ( व्हा. चेअरमन ), ३ डॉ. ना. भि. परुळेकर, एम. ए., पीएच. डी., संचालक–सकाळ, ४ शेठ फ्रामजी पी. पोचा, ५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी ( सोलापूर ), ६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी, ७ शेठ गणपतराव काळूराम नाईक, बी. एससी., बी.ई., एलएल. बी.
मुख्य ऑफिस–४५५, रविवार, पुणें
शाखाः—( १ ) भवानी पेठ, ( २ ) सदाशीव पेठ, पुणें २, ( ३ ) सोलापूर, ( ४ ) सांगली.
हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांवर ड्राफ्टस् व हुंड्या दिल्या जातात.
आपल्याजवळच्या पैशाचा योग्य मोबदला या बँकेच्या निरनिराळ्या योजनेनें घ्या. सेफ डिपॉझिट लॉकरची सोय.
विशेष माहितीकरितां लिहा—
गो. ग. साठे, ए. बी. आय. (लंडन), मॅनेजर

**दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)**

पुणें शाखाः—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

**नवीन पुष्कळ निघाले, तरी**
**तुळजाराम मोदी, सातारा**
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

**दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड**

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

**दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २**

—आमचीं वैशिष्टयें—

(१) काटकसरीचा कारभार (२) खर्चाचें अल्प प्रमाण (३) क्लेम्स ताबडतोब पटविणें (४) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन (५) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठी लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर




**माणिक नं. 20**
कपड्याकरितां उत्तम साबण
**माणिक सोप वर्क्स**
...कराड, (सातारा)...

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.**
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१२,७६० |
| खेळतें भांडवल | रु. | ७०,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व [illegible] वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजिनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.